# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 28.05.2024** **वार–मंगळवार**

---

**कल्याणीनगर अपघात-कोठडी**

कल्याणीनगर पोर्शे कार अपघात प्रकरणी विशाल अगरवाल आणि सुरेंद्र अगरवाल यांना न्यायालयानं ३१ मे पर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पुणे पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकानं पुढील तपासासाठी पोलिस कोठडीची मागणी केली होती.

**अगरवाल तक्रारी**

पुण्यात पोर्शे कार दुर्घटनेतल्या अगरवाल कुटुंबियांविरोधात शहरातल्या विविध भागातून तक्रारी दाखल होत आहेत. तक्रारदारांकडून थेट पोलिस आयुक्तालयात फिर्याद मांडली जात असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**जलाशय वाहातूक**

उजनी धरण अपघाताच्या पार्श्वभुमीवर पुणे जिल्ह्याच्या विविध धरणांच्या जलाशयांत स्थानिकांच्या वाहातुकीसाठी कार्यरत असणाऱ्या बोट चालकांची नोंद करण्याची सूचना देण्यात आल्या आहेत. या बोटचालकांकडे असलेल्या सुरक्षा उपायांबाबत आढावा घेतला जात असून गरज भासल्यास जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित केली जाईल असं आमच्या प्रतिनिधीनं कळवलं आहे. बोटींची नोंदणी नसल्यानं प्रथम स्थानिक तहसीलदारांकडे त्यांची नोंदणी होणार आहे.

**म्हाडा नोंदणी**

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातल्या विविध उत्पन्न गटातल्या नागरिकांसाठी 4 हजार 777 सदनिकांसाठी म्हाडाच्या पुणे विभागानं सोडत जाहीर केली आहे. त्यासाठी येत्या तीस तारखेपर्यंत अर्ज करता येणार आहे. नागरिकांच्या मागणीनुसार अर्जासाठी मुदतवाढ केल्याचं म्हाडानं स्पष्ट केलं आहे. आत्तापर्यंत 40 हजार 779 जणांनी घरासाठी नोंदणी केली असून 21 हजार अर्जदारांनी अनामत रक्कम भरली आहे.

**स्वातंत्रवीर**

स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त फर्गसन महाविद्यालयातली सावरकरांची खोली नागरिकांना अभिवादनासाठी खुली होती. नागरिकांनी आज अभिवादनासाठी गर्दी केली होती. 1902 ते 1905 या कालावधीत सावकर या वसतिगृहात वास्तव्यास होते. त्याचबरोबर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही सावरकर जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाचे कुलगुरू, प्रकुलगुरु, प्रभारी कुलसचिव यावेळी उपस्थित होते. तर स्वातंत्र्यवीर सावरकर फाऊंडेशनच्या वतीनं 'स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती महोत्सव 2024' चे आयोजन करण्यात आलं आहे. याअंतर्गत आज रक्तदान शिबिर भरवण्यात आले.

**फळबाग महिला**

पुणे जिल्ह्यातल्या फळबाग उत्पादक महिला शेतकरी डॉक्टर भाग्यश्री पाटील यांना राज्यस्तरीय राजीव गांधी कृषीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. पाटील यांच्या प्रत्यक्ष शेतबांधावर जाऊन हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

**उन्नत मेट्रो**

पुण्यातल्या हिंजवडी ते शिवाजीनगर या 23 किलोमीटर अंतराच्या उन्नत मेट्रोचे काम प्रगतीपथावर आहे. या मार्गासाठी तयार करण्यात आलेले मेट्रोचे तीन डबे जूनमध्ये पुण्यात दाखल होणार आहेत.

**पिंपरी चिंचवड पाणीपुरवठा**

पिंपरी चिंचवड शहराचा पाणीपुरवठा गुरुवारी संध्याकाळी बंद राहाणार आहे. सकाळच्या वेळेत नियमित पाणीपुरवठा होईल. शुक्रवारी कमी दाबाने, अनियमित पाणीपुरवठा होईल अशी माहिती पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे यांनी दिली आहे.

**मैदानी संघ**

नागपूर इथं एक ते तीन जून दरम्यान होणाऱ्या महाराष्ट्र राज्य वरिष्ठ गटाच्या मैदानी स्पर्धांसाठी पुणे जिल्ह्याचा संघ जाहीर झाला आहे. पुरुष संघाचे नेतृत्व प्रणव गुरव तर महिला संघाचे नेतृत्व अवंतिका नराळे करतील. या स्पर्धेतून राज्याचा संघ निवडला जाईल, हा संघ राष्ट्रीय आंतरराज्य वरिष्ठ गटाच्या मैदानी स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करेल.

**टेबल टेनिस**

शारदा स्पोर्टस् सेंटरच्या वतीनं हंगामातली पहिली जिल्हा मानांकन टेबल टेनिस स्पर्धेला सुरुवात होणार आहे. एकेरी आणि दुहेरी या विभागात 18 गटांमध्ये सामने होतील. अनेक अव्वल खेळाडूंनी स्पर्धेतला आपला सहभाग निश्चित केला आहे.

**स्पोर्ट स्फिल्ड**

तिसऱ्या स्पोर्टस् फिल्ड करंडक अजिंक्यपद 12 वर्षाखालील 25-25 षटकांच्या स्पर्धेत सनराईज स्कूल संघानं फल्लहा अकॅडमीचा पराभव केला आणि उपांत्य फेरी गाठली. अन्य लढतीत साई एमजे स्पोटर्स ॲकॅडमी, क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमी आणि गॅरी कस्टर्न क्रिकेट ॲकॅडमी या संघांनी उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून हवामान ढगाळ होते. दुपारनंतर मात्र उन्हाचा कडाका जाणवू लागला. आज कमाल तापमान 33 अंश तर किमान 25 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस असल्याचं पुणे वेधशाळेनं कळवलं आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**